# प्रेस नोट

| | |
|---|---|
| युनिटचे नाव | लाचलुचपत प्रतीबंधक विभाग बुलडाणा |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्री. राजेश मधुकर मानकर, वय ५२ वर्ष, व्यवसाय नोकरी, पद पोलीस हेड कॉन्स्टेबल, ब.न. ६३५ नेमणुक पोलीस स्टेशन धाड, रा. चांडक ले आऊट, बुलढाणा |
| लाच मागणी | लाचमागणी ५,०००/— रुपये |
| लाच स्विकारले | पडताळणी कार्यवाही दरम्यान २,०००/— रुपये<br>व सापळा कार्यवाही दरम्यान ३०००/— रुपये |
| घटनास्थळ | पोलीस चौकी चांडोळ |
| घटना तारीख | ११.०५.२०२३ |

थोडक्यात हकीकत :— यातील तक्रारदार यांचे व त्यांचे पत्नी विरुध्द पोलीस स्टेशन धाड येथे अदखलपात्र गुन्हा दाखल असून सदर गुन्हयातुन तक्रारदार यांचे पत्नीचे नाव कमी करुन प्रतिबंधक कार्यवाही न करण्यासाठी आलोसे. श्री राजेश मधुकर मानकर, पोलीस हेडकॉन्स्टेबल, पोलीस स्टेशन धाड हे ५०००/— रुपये लाचेची मागणी करीत असल्याबाबत दिनांक ११.०५.२०२३ रोजी लेखी तक्रार लाचलुचपत प्रतीबंधक विभाग बुलडाणा यांचेकडे केली होती.

त्यानुसार दिनांक ११.०५.२०२३ रोजी लाचमागणी पडताळणी कार्यवाही आयोजीत केली असता सदर पडताळणी कार्यवाही दरम्यान आलोसे. श्री. राजेश मानकर, पोलीस हेडकॉन्स्टेबल यांनी तक्रारदार यांचेकडून पंच क्र १ यांचे समक्ष २०००/— रुपये स्विकारुन उर्वरीत ३०००/— रुपये काही वेळाने स्विकारण्यास सहमती दर्शवली.

त्यानुसार नमुद तारीख वेळी व ठिकाणी आयोजीत केलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान आलोसे. श्री. राजेश मानकर, पोलीस हेडकॉन्स्टेबल यांनी तक्रारदार संजय ब्राम्हणे यांचेकडून उर्वरीत ३०००/— रुपये लाच रक्कम पंच क्र १ यांचे समक्ष स्विकारली. त्यावरुन आरोपी श्री. मानकर यांना रंगेहात पकडण्यात आले असून आलोसे. श्री राजेश मानकर, पद पोलीस हेडकॉन्स्टेबल, पोलीस स्टेशन धाड यांचे विरुध्द पोलीस स्टेशन धाड येथे कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा १९८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरु आहे.

सदर कार्यवाही :— १. मा. श्री. मारुती जगताप, पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती
२. मा. श्री. अरुण सावंत, अप्पर पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती
३. मा. श्री. देविदास घेवारे, अप्पर पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती

यांचे मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी श्री. संजय चौधरी, पोलीस उपअधिक्षक अॅन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा व सापळा पथक नापोकॉ. विनोद लोखंडे, नापोकॉ. प्रविण बैरागी, नापोकॉ. रविंद्र दळवी, पोकॉ. गौरव खत्री, पोकॉ. शैलेश सोनवणे यांनी पार पाडली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत अॅन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा.कार्यालय दुरध्वनी कमांक ०७२६२—२४२५४८ व ८८८८७६८२१८ तसेच टोल फ्रि कमांक १०६४ यावर संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस उपअधिक्षक अॅन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा यांनी केले आहे

पोलीस उप अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, बुलडाणा (शिक्का)

( संजय चौधरी )
पोलीस उपअधिक्षक
अॅन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा

Scanned with CamScanner